मे २०१०
खंड ३ अंक ३
श्री राम चंद्र मिशन
India ECHOES
ONE WORLD ONE HUMANITY
For Private Circulation Only

# पू. बाबूजी महाराजांचा १११वा जयंती सोहळा




दि. २९ एप्रिल ते १ मे २०१० दरम्यान तिरुप्पूरमधील डी.जे.पार्क येथे पू. बाबूजी महाराजांची १११ वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी सुमारे ९००० अभ्यासी उपस्थित होते. दि. २९ रोजी पू. गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले व त्यानंतर विविध नवीन साहित्याचे प्रकाशन केले. दि. ३० एप्रिल रोजी पू. गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले व त्यानंतर पू. बाबूजी महाराजांचे ३ संदेश वाचून दाखविले व ९ लग्ने संपन्न केलीत.

दि. १९ एप्रिल २०१० च्या (बाबूजींचा महासमाधी दिवस) आपल्या प्रथम संदेशात बाबूजी म्हणतात, “आत्म्याच्या दिव्यत्वाच्या प्राप्तीसाठी जे त्याच्या प्रवासाचे एकमेव लक्ष्य आहे, प्रत्येक गोष्ट त्याच्या उद्धाराकरिता आपल्या पद्धतीने त्याला (आत्म्याला) पूरक अशीच घडत असते. त्यांना (अभ्यासींना) प्रारंभापासूनच मुलभूत तत्वे दिली गेलेली आहेत. हे आपल्या अभ्यासींवर अवलंबून आहे की त्यांनी आपली प्रगती आपल्या प्रयत्नांनी व चिकाटीने वाढवावी.”

दुसरा संदेश दि. २९ एप्रिल २०१० रोजी प्राप्त झाला: “निष्ठावान आत्म्यांचे येथे खाली होणारे हे संमेलन हेलावून टाकणारे आहे. खऱ्या प्रेमाचे हे गीत आमच्यापर्यंत पोहोचले आहे. ... या जयंती समारोहापलीकडे सारे मिशन या समारोहात सहभागी आहे. हृदयांना प्रकाशमान करणाऱ्या दिव्यत्वाच्या प्रवाहास ते आकर्षित करित आहेत.”

दि. ३० च्या सकाळी प्राप्त झालेल्या संदेशामध्ये पू. गुरुदेवांना उद्देशुन पू. बाबूजी म्हणतात, “माझ्या पुत्रा, तु या सगळ्यांचा प्रमुख आहेस, जन्मत:च संघटक. या परिमाणाने तुला मिशनमध्ये असे एक विशेष स्थान प्रदान केले आहे जेथे येणाऱ्या कित्येक शतकांपर्यंत तुझ्याकडे आदर्श म्हणून पाहिले जाईल. हे उद्याचे विश्व त्या एकमेवाद्वितीय शक्तिला जाणून घेऊन त्यांच्या चांगल्यासाठी एकत्र येवोत जिच्याशिवाय ते कितीतरी अगोदर नष्ट झाले असते”

पू. गुरुदेव म्हणाले की 'साधका'साठी ३ गोष्टिंची आवश्यकता आहे गुरुदेवांप्रती प्रेम, गुरुदेवांसमवेत सत्संग व गुरुदेवांचे आज्ञापालन. दैनिक साधनेद्वारे प्रत्येकाने आपल्यामधील ती दैवीय ज्योत सतत तेवत ठेवली पाहिजे. त्यांनी पू. बाबुजी महाराजांच्यावेळी साजऱ्या केलेल्या भंडाऱ्यांच्या आठवणी सांगितल्या की ज्यावेळी हृदये प्रेमाने ओथंबलेली असत व अध्यात्मिक प्रगतीची कुठलीही लालसा नसे. ते म्हणाले की “हे काही देवाण घेवाणीची जागा नाही. 'त्यांच्या' मर्जीने ते जे काही देतील आणि ते जेव्हा

For the complete audio of this speech please visit http://www.sahajmarg.org/audio/talk/april-30-2010-tiruppur






आपणांस पात्र समजतील तेव्हाच देतील यांत आनंद मानुन ते देत असलेली प्रत्येक गोष्ट प्राप्त करण्यासाठी आपल्याकडे असलेले सर्वकाही मोकळ्या मैदानात फेकून देणे गरजेचे आहे."

"सहजमार्ग जिवनामध्ये साधेपणा शिकवितो. ... तुमच्यापैकी प्रत्येकाने आपापल्या वैयक्तिक जिवनामध्ये साधेपणा प्राप्त करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. तुमच्या गरजा कमी करा, तुमच्या इच्छा साध्या असू द्या, लक्षात घ्या की बाबूजींनी आपल्याला आपल्या गरजा पूर्ण करण्यासंबंधी आश्वस्त केले आहे. आपल्या इच्छांचा येथे काहिही संबंध नाही.

रात्रीच्या जेवणानंतर झालेलय सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये लालाजी मेमोरिअल ओमेगा स्कूलच्या शिक्षकांनी सादर केलेले नृत्य, मुंबईच्या अभ्यासींनी सादर केलेले नाटक व डॉ. जयंती व कुमारेश यांनी सादर केलेल्या संगीतमय कार्यक्रमाचा समावेश होता. या समारोहाच्या अध्यात्मिक वातावरणामध्ये सर्व अभ्यासी समरस झाले होते व या निमीत्ताने त्यांना गुरुदेवांच्या कार्यामध्ये भाग घेऊन त्यांची सेवा करण्याची संधी मिळाली.





## गुरुदेवांचा प्रवास

### चेन्नई



जबलपूर येथील बसंत उत्सवानंतर १० फेब्रुवारी रोजी गुरुदेव चेन्नई येथे परतले. लवकरच त्यांनी लालाजी मेमोरिअल ओमेगा इंटरनॅशनल शाळेला भेट दिली व तेथील बांधकामाची पहाणी केली. गुरुदेव एखाद्या बालकाप्रमाणे निर्व्याज उत्साहाने वावरत होते तर इतक्या कठीण प्रवासानंतर त्यांना विश्रामाची गरज आहे असे अभ्यासींना वाटत होते. पुढील काही दिवस गुरुदेवांनी विश्रांती घेतली.

१५ फेब्रुवारी रोजी गुरुदेवांनी रशियन अभ्यासींबरोबर नाश्ता घेताना शास्त्रे, देवालये, धार्मिक रूढी इत्यादींबद्दल चर्चा केली. ते म्हणाले, "आपल्या मूळ घरी परतणे हा आपल्या आयुष्याचा उद्देश आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या मार्गाला धर्म असे म्हटले जात असे. परंतु धर्माने जगभरातील माणसांचे विभाजन केले आहे. याउलट आध्यात्मिकता त्यांना परस्पराशी जोडते "

भयाला कसे दूर करावे या प्रश्नाच्या उत्तरात गुरुदेव म्हणाले, "ख्रिस्ती धर्मात येशु ख्रिस्त असे सांगतात की परिपूर्ण प्रेम हे भीतीचा नाश करते. आपल्यापाशी प्रेम नसून आपल्यापाशी आहे फक्त बंधने, फक्त परावलंबित्व, केवळ गरज. प्रेम कुठे आहे? याचा अर्थ असा, की जिथे प्रेम नसते तिथे भय असते. आपल्याला असे वाटते की आपले कोणावरतरी प्रेम आहे. परंतु आपण खरे प्रेम करतच नाही. केवळ प्रेम हेच भयाचा नाश करू शकते. जर आपल्याला आपल्या वडिलांची भीती वाटत असेल तर आपण त्यांच्यावर प्रेम करु शकत नाही. जर तुम्हाला 'माझे तुझ्यावर प्रेम आहे' असे कुणालाही सांगायचे असेल तर ते मनापासून सांगा, एक उपचार म्हणून नको"

पुढील काही दिवस गुरुदेवांनी अभ्यासींच्या भेटी-गाठी घेण्यात, विशेषतः परदेशातून आलेल्या अभ्यासींना भेटण्यात व्यतीत केले. संध्याकाळी कुटीराच्या हिरवळीवर बसून ते



मुंबईच्या अभ्यासीं समवेत








अभ्यासींबरोबर चर्चा करत असत व या चर्चेचा शेवट तेथे उपस्थित असणाऱ्या नशीबवान अभ्यासींना सिटींग देण्यात होत असे. दि. २५ फेब्रुवारी रोजी गुरुदेवांनी ध्यान–कक्षात सत्संगाचे संचलन केले व काही विवाह संपन्न केले.

मुंबईहून सुमारे ४०० अभ्यासींचा समुदाय गुरुदेवांबरोबर राहण्याकरिता चेन्नई येथे आला होता. अभ्यासींपैकी अनेकांना स्वतंत्रपणे भेटून, अनेक सिटींग देऊन गुरुदेवांनी त्यांची विशेष काळजी घेतली. शनिवारी संध्याकाळी आरामकक्षात मुंबईतील अभ्यासींना भेटून त्यांच्याबरोबर गप्पागोष्टी केल्या. सर्व केंद्रांना भेटी देणे गुरुदेवांसाठी कठीण होत चालले आहे. त्यामुळे केवळ गुरुदेवांबरोबर राहण्याकरिता मोठा प्रवास करून आलेल्या अभ्यासींचे त्यांनी आभार मानले व ते पुन:–पुन: यावेत अशी आशा व्यक्त केली.

दि. २५ फेब्रुवारी रोजी मुंबईच्या अभ्यासींनी बाबूजी महाराजांच्या जीवनावर आधारित एक छोटे प्रहसन सादर केले. पूज्य बाबूजींच्या आयुष्यातील विविध प्रसंग दर्शविणाऱ्या या नाटकाने प्रेक्षकांच्या हृदयाला स्पर्श केला. यानंतर गुरुदेवांनी नाटकात काम करणाऱ्या अभ्यासींची भेट घेतली व त्यांच्याबरोबर बाबूजींच्या सुखद आठवणींना उजाळा दिला. यावेळी वातावरण दिव्यत्वाने भारलेले होते व आपण शाहजहाँपूर येथे आहोत अशी अनुभूती उपस्थितांना होत होती.

## त्रिची

सुमारे ३० अभ्यासींसोबत गुरुदेवांनी त्रिची येथे जाण्याकरिता प्रस्थान केले. स्थानिक अभ्यासींनी केलेल्या स्वागतानंतर शहरातील केंद्रापासून ८ कि.मी. अंतरावर असणाऱ्या जानकी फार्मला गुरुदेवांनी भेट दिली.

बुधवार, दि. ३ मार्च रोजी गुरुदेवांनी आश्रमात सत्संगाचे संचलन केले. तेथून परतल्यावर त्यांनी गाईंच्या गोठ्याला भेट दिली व पाच नवजात वासरांचे नामकरण केले. यावेळी गुरुदेव प्रसन्न मनस्थितीत होते व त्यांनी वासरांच्या नामकरण समारंभाचा आनंद घेतला.

दि. ४ मार्च रोजी गुरुदेवांनी जानकी फार्म येथील भात–शेतीची पहाणी केली. या प्रसंगी भाताची रोपे लावण्यात अनेक अभ्यासींनी भाग घेतला. शेतात चिखल असूनसुद्धा एखाद्या उत्सवाप्रमाणे वातावरण होते. जमलेल्या अभ्यासींकरिता गुरुदेवांनी सत्संगाचे संचलन केले. सायंकाळी गुरुदेव कुटीरासमोरच्या हिरवळीवर आसनस्थ झाले आणि त्यांनी काही परदेशी अभ्यासींची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी सत्संगाचे संचलन केले.

दि. ७ मार्च रोजी ध्यान–कक्षात झालेल्या सत्संगात काही स्थानिक अभ्यासींनी सुद्धा भाग घेतला. गुरुदेव प्रसन्न व प्रकृतीने उत्तम वाटत होते. त्रिची येथील मुक्कामात गुरुदेव शेतावर फेरफटका मारण्याकरिता अनेकदा बाहेर आले. गुरुदेवांना अत्यंत आवश्यक असणारी शांतता आणि सतत चालू असलेले त्यांचे काम यामध्ये त्यांनी हा काळ व्यतीत केला. १० मार्च रोजी गुरुदेव चेन्नई येथे परतले व कलकत्ता व खरगपूर येथे जाण्याकरिता त्यांनी प्रस्थान केले.

## क्रेस्ट– खरगपूर

दि. १२ मार्च रोजी गुरुदेवांचे क्रेस्टच्या परिसरात आगमन झाले व त्यांनी ५ वाजताच्या सत्संगाचे संचलन केले. दि. १२ ते १४ मार्च २०१० या दरम्यान खरगपूर येथे दुसऱ्या 'नवीन प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचे' आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम प्रामुख्याने नवीन प्रशिक्षकांसाठी होता. त्यांना सहज मार्गाच्या विविध पैलूंची जाणीव करून देणे, ज्यायोगे ते आपले प्रशिक्षकाचे कर्तव्य सुलभतेने पार पाडू शकतील असा यामागील उद्देश होता.

यावेळी गुरुदेवांनी लता–कुंजाचे उद्घाटन केले व सभोवती शांतपणे जमा झालेल्या अभ्यासींबरोबर त्यांनी स्तब्ध वातावरणाचा आनंद घेतला. इतर वेळी अभ्यासींना लता–कुंजात येण्यास परवानगी आहे का याप्रश्नावर ते उत्तरले, होय. ही जागा सर्वांकरिता आहे. लता–कुंजाची स्वच्छता, शुचिता व पावित्र्य हे संभाळले गेले पाहिजे यावर त्यांनी भर दिला. गंगा व गणेश यांच्या मूर्ती कुठे उभाराव्यात याबद्दल गुरुदेवांनी सूचना दिल्या. या कामावर त्यांना स्वत:ला देखरेख करता यावी याकरिता मूर्ती उभारण्याचे काम दुसऱ्या दिवशीपासून सुरु करण्यात आले.











दि. १५ ते २१ मार्च या दरम्यान क्रेस्ट येथे इराणी अभ्यासींकरिता आंतरराष्ट्रीय अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात आले होते. गुरुदेवांच्या उपस्थितीत काही दिवस व्यतीत करण्यासाठी त्यांना आमंत्रित करण्यात आले होते.

ध्यान–कक्षात उपस्थित असणाऱ्या अभ्यासींना उत्साहपूर्ण 'सलाम' करून गुरुदेवांनी अनेक सत्संगांचे संचलन स्वत: केले. यावेळी इराणी अभ्यासीही तितक्याच उत्साहाने व जोषपूर्णतेने गुरुदेवांना 'सलाम' असे प्रत्युत्तर देत असत. युवक–सभा, ३० प्रशिक्षकांची सभा इत्यादी कार्यक्रम इराणी अभ्यासींकरिता आयोजित करण्यात आले होते. संध्याकाळच्या प्रश्नोत्तरांच्या कार्यक्रमात गुरुदेवांनी स्वत: भाग घेतला. रोजच्या साधनेबद्दल स्पष्टीकरण, स्त्रियांचा सहभाग, दहा नियम, सभ्यता व चारित्र्याची जडण–घडण, व्हि.बि.एस.ई. इत्यादि विषयांवर यावेळी चर्चा झाली.

इराणकरिता गुरुदेवांनी पाच नव्या प्रशिक्षकांची नियुक्ती केली. या आठवड्याचा शेवट गुरुदेवांबरोबरच्या प्रश्नोत्तरांच्या कार्यक्रमाने झाला.

इराणी अभ्यासींची भेट व इराणी नव–वर्ष एकाच सुमारास होते. 'चहार–शान्बेह–सूरी' हा समारंभ 'नवरोझ' च्या आधीच्या मंगळवारी आयोजित करण्यात आला होता. तीन छोटे अग्नी प्रज्वलीत करण्यात आहे व उपस्थितांनी गात व वाद्यांच्या गजरात त्यांना पार केले. गुरुदेव स्वत: त्यांच्या गोल्फ–गाडीतून हा समारंभ पाहण्याकरिता उपस्थित होते.

दि. २० मार्च हा दिवस 'नवरोझ' म्हणजेच इराणी नूतन वर्षाची सुरुवात होती. भोजन–कक्षात पारंपारिक पद्धतीने जेवणाचे टेबल सजविले होते. भोजनातील विशेष पदार्थांबद्दल गुरुदेवांना थोड्क्यात माहिती देण्यात आली. रात्रीच्या भोजनानंतर इराणी अभ्यासींनी सादर केलेल्या नृत्य व संगीताचा यावेळी केवळ गुरुदेवांनीच नव्हे, तर भोजन–कक्षात उपस्थित असणाऱ्या सर्वांनीच आनंद घेतला. इराणी नव–वर्षाच्या स्वागतासाठी रात्री १०.३० वाजता होणाऱ्या सत्संगाच्या आयोजनाची घोषणा या कार्यक्रमाचा कळसाध्याय होता असे म्हणावे लागेल.

दि. १७ मार्च रोजी गुरुदेवांनी गंगा व गणेशाच्या मूर्तींच्या स्थापनेची देखरेख केली. दि. २१ मार्च रोजी कलकत्ता येथे परतल्यावर त्यांचा मुक्काम बंधु अजय भट्टर यांच्या निवासस्थानी होता. दि. २४ मार्च रोजी ते चेन्नईकरिता रवाना झाले. इराणी अभ्यासींनी गुरुदेवांना प्रेमपूर्वक, साश्रू नयनांनी निरोप दिला. त्यांच्या प्रिय गुरुदेवांबरोबर व्यतीत केलेला हा कालखंड आपल्या ह्रुदयात साठवून ते मायदेशी परतले.

## कर्नाटक संमेलन

गुरुदेव चेन्नई येथे परतल्यावर प्रकृति–अस्वास्थ्यामुळे त्यांच्या कुटीरात भेटीसाठी परवानगी नव्हती. रविवारी त्यांनी संचलित केलेल्या सत्संगात अभ्यासींना त्यांच्या दर्शनाची संधी मिळाली.

दि. २ एप्रिल ते ४ एप्रिल या दरम्यान कर्नाटकातील सुमारे ३००० अभ्यासींचे संमेलन आयोजित करण्यात आले होते. त्या तीन दिवसात गुरुदेवांनी ५ सिटींग्ज दिल्या व अभ्यासींची हृदये आनंदाने ओसंडून वाहू लागली.

मणपक्कम आश्रमातील देखभाल व दुरुस्ती समितीने आश्रमाच्या साफ–सफाईचे मोठे काम करण्याचे ठरविले होते. सुमारे २५० उत्साही स्वयसेवकांनी तळपत्या उन्हात कठोर मेहनत करुन आश्रमात आजुबाजूला पडलेले बांधकाम साहित्य साफसूफ केले. आंब्याची बाग, खत बनवण्याची जागा, वाहनतळ, भोजन–कक्ष व प्रसाधन कक्षाचीही या वेळी साफ–सफाई करण्यात आली. हे अवाढव्य काम स्वयंसेवकांनी आनंदाने स्वीकारले होते व ते करताना त्यांना गुरुदेवांच्या अस्तित्वाची अनुभूति येत होती.

दि. ३ एप्रिलचा सांस्कृतिक कार्यक्रम गुरुदेवांनी त्यांच्या कुटीरात छोट्या पडद्यावर (टेलिविजनवर) बघितला. त्यानंतर त्यांनी कलाकारांची भेट घेतली व त्यांच्याबरोबर काही काळ व्यतीत केला. व्हि.बि.एस.ई. अभ्यासक्रमातील अनेक प्रयोग 'शास्त्र व जादू' या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी सादर केले होते. दि. ४ एप्रिलच्या रविवारच्या सत्संगानंतर बंधु दोराइस्वामी यांनी आपले काही विचार मांडले. भाषा व प्रांताच्या अंधभक्तीला दूर ठेवण्याबद्दल गुरुदेव काही वेळ बोलले.


पुढचा आठवडा गुरुदेवांनी आश्रमात शांततेत व्यतीत केला. दि. ९ एप्रिलच्या सत्संगानंतर त्यांनी ९ विवाह संपन्न केले. तमिळ व मल्याळम नव–वर्षाच्या स्वागताकरिता त्यांनी सत्संगाचे संचलन केले. सुमारे ४५०० स्थानिक अभ्यासी या वेळी उपस्थित होते.

दि. १६ एप्रिल रोजी कोइंबतूर मार्गे तिरुप्पूरला जाण्याकरिता गुरुदेवांनी प्रस्थान केले. दि. २९ एप्रिल ते १ मे या कालावधीत साजऱ्या केल्या जाणाऱ्या पूज्य बाबूजी महाराजांच्या जयंती उत्सवापर्यंत त्यांचा मुक्काम तिरुप्पूर येथे असणार आहे.


# नवीन प्रकाशने


## हृदयीचे बोल २००९

हृदयीचे बोल २००९, हे हृदयीचे बोल ह्या मालिकेतील नवीन पुष्प आहे. यामध्ये या वर्षातील गुरूदेवांच्या भारत दौऱ्यातील प्रेरणादायी भाषणांचा आणि अनौपचारिक संभाषणांचा समावेश आहे.






| सत्योदय (कन्नड पुन:प्रकाशन) | दैनिक चिंतन (चायनीज) |
|---|---|








| सहज मार्गाची तत्वे खंड १ | मानव विकासात सदगुरुंची भूमिका (तामिळ) |
|---|---|



| सहजमार्गाच्या दहा सूत्रांवरील भाष्य (मराठी) | प्रियतम से प्रियतम तक का सफर – भाग २ |
|---|---|




## तमिळ भाषणांचा एम्. पी.३ संग्रह



पू. गुरुदेवांनी तामिळनाडूत मदुराई, तिरूपूर, त्रिची, चेन्नई इत्यादी विविध ठिकाणी दिलेल्या भाषणांचे हे संकलन आहे. ह्या मालिकेतील हे दुसरे प्रकाशन आहे. ह्यात १९७९ पासूनच्या, म्हणजे गेल्या ३ दशकातील भाषणांचा समावेश आहे. हे साधारण ४ तासांचे ध्वनिमुद्रण आहे. ह्यात काही सुंदर, अनौपचारिक संभाषणे आणि गुरूदेवांबरोबरचे प्रश्न–उत्तरांचे सत्र आहे ज्यात गुरूदेवांनी बऱ्याच व्यवहारिक प्रश्नांना उत्तरे दिली आहेत.

## छायाचित्र संग्रहाचे प्रकाशन




### बाबूजी छायाचित्रांचा संग्रह

ह्या मालिकेतील प्रसिद्ध होणारे पहिले पुस्तक, बाबूजींच्या छायाचित्रांचा हा एक संग्रह आहे. अतिशय उत्कृष्ट काळ्या कागदावर २० छायाचित्र स्थानापन्न आहेत.

### छायाचित्रे

आपल्या पू. गुरुदेवांच्या नजिकच्या काळातील काही छायाचित्रांसह, बाबूजींची सुमारे २० छायाचित्रे आहेत.

### संग्रहाची छपाई

बाबूजींच्या आणि गुरुदेवांच्या छायाचित्रांची नवी मालिका प्रस्तुत आहे ज्यामध्ये छायाचित्राचा आकार, बाजूची चौकट आणि छायाचित्राची बैठक यामध्ये पर्याय उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

## धारवाडचे मूल्याधारित अध्यात्मिक शिक्षणा संबंधी कार्य

दि. २७ मार्च रोजी धारवाडच्या एस्.डी.एम् केंद्रीय विद्यालयामध्ये व्हि.बी.एस्.ई. कार्यक्रम आयोजित केला होता. बंगलोरच्या भगिनी आशा आणि भगिनी माधुरी यांनी या कार्यक्रमाचे संचालन केले. या प्रकारचा कार्यक्रम इथे करण्याची ही दुसरी वेळ होती.

हुबळी येथे ऑगस्ट ०९ मधे एस्.आर.सी.एम्. ने सादर केलेल्या व्हि.बी.एस्. ई.. कार्यक्रमाला या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती साधना उपस्थित होत्या व त्यांच्याच विनंतीवरुन हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

ह्या कार्यक्रमात मूल्य, मूल्य प्राप्त करण्याचे तीन मार्ग, आणि मन–संतुलन हे विषय हाताळले गेले. उपस्थितांनी कार्यक्रमाचे चांगले स्वागत केले आणि त्यांनी विचारलेल्या प्रश्नांवरून त्यांची आवड सहज लक्षात येत होती. त्यांच्यामते या प्रकारचे अनेक कार्यक्रम त्यांच्या शाळेत आयोजित झाले पाहिजेत.

## स्वयंसेवकांसाठी प्रशिक्षण, काकिनाडा, आंध्र प्रदेश

दि. १३ व १४ फेब्रुवारी रोजी आंध्र प्रदेशातील काकिनाडा ह्या केंद्रात दोन दिवसांचा प्रादेशिक पातळीवरील कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाची योजना विभागीय प्रमुख बंधु के. मधू यांची होती व ती प्रत्यक्षात आणण्याचे कार्य काकिनाडाचे केंद्रप्रमुख बंधु कोसुरी यदुसूर्वा यांनी केले. या कार्यक्रमाचा विषय, विभागातील उत्साही स्वयंसेवकांना केंद्रात करता येण्यासारख्या कार्यक्रमांची माहीती करून देणे होता; ज्यामुळे आपल्या संस्थेचा उद्देश प्रत्येकापर्यंत पोचोवण्यास मदत होइल. या दोन दिवसीय कार्यक्रमात व्हि.बी.एस्.ई. शिक्षकांसाठी प्रशिक्षण, खुले चर्चासत्राचे आयोजन आणि सादरीकरण, घरगुती मेळावे इत्यादी विषयांवर लक्ष पुरविले गेले. या वेळी मुलांसाठीसुद्धा काही कार्यक्रमांचे आयोजन केले गेले होते ज्यामध्ये चित्रकला, शास्त्रीय पद्धतीवर आधारित विषय, नेतृत्व, खेळ इत्यादिंचा समावेश होता. साधारणत: १५० पेक्षा जास्त अभ्यासी ह्यात सहभागी झाले आणि त्यांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.







## रेडिओ प्रक्षेपण

दि. १७ एप्रिल रोजी कर्नाटकमधील तुमकूरच्या रेडिओ सिद्धार्थने सहजमार्गाच्या ध्यानपद्धतीविषयी जास्त माहिती करुन घेण्याकरिता एका मुलाखतीचे आयोजन केले होते. बेंगलोरच्या भगिनी वसंतकुमारी यांनी सुमारे ४० मिनिटे प्रश्नांची कानडीमधून उत्तरे दिली. यामध्ये सहजमार्ग एखाद्याला कसे लाभदायक आहे, आंतरिक बदलासाठी ध्यानाची गरज काय आहे, संतुलित जीवन, सहजमार्गाचे मूळ उद्दिष्ट आणि सदगुरूंची भूमिका असे विषय चर्चिले गेले. रेडिओ सिद्धार्थ हे एक एस एस आई टी कॉलेजमध्ये स्थापिलेले विशिष्ट समूहांसाठीचे एफ़ एम चॅनल आहे आणि स्थानिक लोकांसाठी लाभदायक असे कार्यक्रम दररोज सायंकाळी ६ ते ८ दरम्यान प्रक्षेपित केले जातात.

## नवीन प्रशिक्षकांचा प्रशिक्षण कार्यक्रम

दि. १२ मार्च ते १४ मार्च दरम्यान खरगपूर येथील CREST येथे नवीन प्रशिक्षकांच्या दुसऱ्या गटाचा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला गेला. दररोजचा कार्यक्रम सकाळी ६ वाजता सामूहिक चर्चेने सुरु होऊन त्यानंतर ध्यान व न्याहरी होत असे. सकाळी ९ वाजताच्या सत्रामध्ये Whispers मधील एक पाठ वाचला जाउन त्यावर विचार विनिमय व भाषणे होत. दुपारच्या जेवण व वामकुक्षीनंतर सहभागी पुन्हा सकारात्मक धारणा, अंतरातील आवाजाचे अनुसरण आणि बोधन व सल्ला टाळण्याची गरज अशा विषयांवर सामुहिक चर्चेसाठी एकत्र येत.

या दुसऱ्या गटामधील विशेष गोष्ट म्हणजे सहापैकी चार वक्ते हे पाश्चात्य देशांचे होते आणि त्यांनी सहजमार्गामध्ये बाबूजींच्या काळामध्ये १९७० मध्ये प्रवेश केला होता. जर्मनीच्या डॉरिट वार्निंग यांनी 'सहज मार्ग– एक जीवनशैली' यावर वक्तव्य केले तर अलमोराचे चुपल भूपेंद्र हे 'प्रशिक्षकाचे कार्य' यावर बोलले. दुसऱ्या दिवशी अजय भट्टर यांनी 'प्रशिक्षकाची भूमिका व जवाबदारी' यावर व त्यानंतर इटलीच्या फ़ॉस्टो रुस्सो यांनी 'आदरात्मक दृष्टीकोन' यावर भाषण केले. तिसऱ्या दिवशी म्युनिकच्या ओटटो रीशेन्डर यांनी 'प्रेम व समर्पण' यावर व कॅनडाच्या क्रिस्टिन प्रिसलँड यांनी त्यांच्या बाबूजी महाराज व पुज्य गुरुदेवांच्या समवेत झालेल्या संभाषणांमधून 'मी प्रशिक्षक होऊन काय शिकले' हे गोष्टीरुपाने सांगितले. शेवटी, कार्यक्रमाचे आयोजक, तिरुपुरचे एन. प्रकाश यांनी गेल्या तीन दिवसांच्या गतिविधी व चर्चांचा मागोवा घेत भविष्याकाळातील कामाचा आढावा देऊन 'गुरुदेवांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करा' अशा आशयाचे भाषण दिले. भविष्यकाळातील प्रशिक्षण कार्यक्रम भारतातील विविध स्थळांमध्ये घेतले जाणार आहेत.

## आतंकवादाला समजणे व प्रतिसाद देणे

संस्थेचे संयुक्त सचिव बंधु ए. पी दुरै आणि दक्षिण कर्नाटकचे क्षेत्रीय प्रभारी बंधु शरत हेगडे यांना पुज्य गुरुदेवांनी 'आतंकवादाला समजणे व प्रतिसाद' या संम्मेलनामध्ये श्री राम चंद्र मिशनचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पाठविले होते. हे संम्मेलन Ecumenical Christian Center (ECC) ने बेंगलोर येथे दि. २२ ते २४ फेब्रुवारी दरम्यान आयोजित केले होते. या विषयावर आपले मत व्यक्त करण्याकरिता या संम्मेलनामध्ये भारताच्या विविध ठिकाणाहून निरनिराळ्या धर्माचे लोक एकत्र जमले होते. विविध क्षेत्रातील तज्ञांना आपले विचार व्यक्त करण्यासाठी आमंत्रित केले होते व चर्चा करण्यात आली.

आपल्या स्वागतपर भाषणामध्ये इ.सी.सी. चे अध्यक्ष डॉ. मणि चाको हे विश्वनितीकडे वाटचाल करणे व धर्मापलीकडे पहाण्याच्या गरजेवर बोलले. ICSA चे अध्यक्ष डॉ. मोजेस मनोहर हे या समस्येकडे एका नवीन दृष्टीकोनातून पाहणे, सरकारमध्ये संवेदनशीलतेची गरज आणि धर्मगुरुंनी लोकांना सद्सद्विवेक बुद्धीचा वापर करण्याचे आवाहन करण्याची गरज याविषयांवर बोलले.

चर्चासत्रामध्ये बंधु दुरै हे 'धर्मापलीकडे जाऊन अध्यात्मिकतेमधे जाण्याची, स्वत:मध्ये आंतरिक बदल घडवून नंतर एकत्रितपणे समाजामध्ये एकंदर बदल घडवून आणण्याची गरज' यावर बोलले.

संम्मेलनाची सर्वांनीच बरीच प्रशंसा केली परंतु काही धर्माभिमानी लोकांवर या संम्मेलनाचा उल्लेखनीय प्रभाव पडलेला जाणवला.



## भगिनींसाठी कार्यशाळा



दि. २१ मार्च रोजी इंदौर केंद्रानी अभ्यासी भगिनींसाठी एक आगळी वेगळी अर्धदिवसीय कार्यशाळा आयोजली होती. ह्या कार्यक्रमाचा विषय होता, 'साधना आणि अभ्यासी भगिनींना पार पाडाव्या लागणाऱ्या विविध भूमिका ह्यातील समन्वय' . इंदौर आणि जवळच्या इतर केंद्रांतून साधारण १०० भगिनींनी ह्यात भाग घेतला. भगिनी विजया देशपांडेंनी स्पष्ट केले की जरी पुरूष व स्त्रियांसाठी आपली साधना पद्धती एकाच प्रकारची असली आणि शेवटी त्या परमात्म्यात विलीन होणारा आत्माही एकसारखाच असला, तरी इथे पृथ्वीवर मात्र स्त्री–पुरूषांना जन्मानुसार दोन वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका वठवाव्या लागतात. आपण हे समजून घेतले पाहीजे की आपल्या प्रिय गुरूदेवांना एकच कृती आपल्याकडून कशी वेगळ्या प्रकारे अपेक्षित आहे. यावेळी भगिनींनी साधना करत असतांनाच बरोबरीने घर–संसार सांभाळतांना, शिक्षिकेची, डॉक्टरची किंवा एखाद्या न्यायाधिशाची जबाबदारी पेलतांना आलेले अनुभव सांगितले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात, भगिनींनी साधना करत असतांना आलेल्या विशिष्ठ अडचणींना कसे तोंड दिले, ह्यावर गट चर्चा आयोजित केली गेली होती. यावेळी अभ्यासी बंधुंनी स्वयंपाकघरात आणि इतर ठिकाणी स्वेच्छेने काम करून ह्या कार्यक्रमात आपले योगदान दिले.

## प्रकाशन विभागाकडून संदेश

असे निदर्शनास आले आहे की, अभ्यासी गुरूदेवांच्या औपचारिक/अनौपचारिक भाषणांचे उतारे करून ई–मेल द्वारे इतरांना पाठवतात जे साखळीप्रमाणे वाढतच जाते. अशा प्रकारच्या मजकुरांत काही त्रुटी असू शकतात आणि त्याचे आकलन किंवा गुरूदेव नक्की काय म्हणाले त्याचा मतितार्थ समजण्यात गफलत होऊ शकते, जे पर्यायाने आपल्या संस्थेसाठी धोकादायक आहे.


अशाप्रकारच्या अनधिकृत आवृत्तीच्या अभिसरणास परवानगी/ अनुज्ञा नाही हे येथे कृपया लक्षात घेतले गेले पाहिजे.

सर्व अभ्यासींना अशी नम्र विनंती आहे की त्यांनी अशा अनधिकृत उताऱ्यांच्या खाजगी वितरणासंदर्भातील हालचालींना प्रोत्साहन देऊ नये तसेच त्या त्वरित थांबवाव्यात. अशाप्रकारच्या अनधिकृत वितरणाची सुचना आपण त्वरीत publications.print@srcm.org येथे देऊ शकतात.

गुरूदेवांची अधिकृत भाषणे प्रसंगानंतर अगदी थोड्याच दिवसांत संस्थेच्या संकेतस्थळावर (www.sahajmarg.org) प्रसिद्ध केली जातात. ती सर्वांसाठी उपलब्ध असतात.

## भूतकाळाचे पुनरावलोकन

आदरणीय बाबूजी महाराजांनी सन १९६० ते १९६५ ह्या काळात संपूर्ण भारतभर प्रवास केला. सन् १९६४–६५ ह्या काळातील त्यांच्या दौऱ्याचा वृत्तांत 'सहज मार्ग' पत्रिकेत प्रसिद्ध झाला होता ज्यात त्यांनी भेट दिलेल्या ठिकाणांची यादी आहे दिल्ली, विजयवाडा, हैद्राबाद, बिदर, सिडम, गुलबर्गा, बिजापूर, हासन, मैसूर, बंगलोर, तिरुवनमलई, त्रिची, तिरूपति, चुड्डापाह, चेन्नई, भोपाल, ओरई आणि लखनऊ.




ह्या दौऱ्याच्या काळात बाबूजी महाराजांनी विविध संदेश दिले. त्यातल्या काही संदेशांतील सारांश येथे प्रस्तुत आहे.

### सप्टेंबर १९६०

“अध्यात्मासाठी सगळ्यात गरजेचे आहे ते म्हणजे अतिरेक टाळणे. ह्या शब्दाचा अर्थ अतिशय गहन आहे. दुसऱ्यांना मान्य होईल असा आपल्या बाह्यजिवन पद्धतित बदल करणे, एवढ्यापुरताच तो मर्यादित नसून आपल्या संपूर्ण मानसिक आणि शारीरिक कार्यकलाप( हालचालीं) त्याच्या आवाक्यात येतात.”

*स्त्रोत समग्र संदेश 'माझ्या गुरूदेवांचे संदेश'

### मार्च १९६४, होळीनिमीत्त बाबूजींचा संदेश

लक्ष्यापर्यंत तोच पोहोचु शकतो ज्याने तेथे पोहोचण्याचा ध्यास घेतला आहे (जो त्यासाठी वेडा झाला आहे). हा एकमेव मार्ग आहे आणि जो ही हा स्विकारेल त्याचे यश निश्चित आहे. पण त्यासाठी तुम्हाला तुमच्या हृदयात तळमळ (वेदना) निर्माण करावी लागेल. व्यथा आहे तर त्याचा इलाजही निश्चित होणार. सर्व मार्ग आणि साधना ह्यांचे लक्ष एकच आहे.”

“जे ही कृतित उतरते ते नेहेमीच परमेश्वराच्या इच्छेनुसार असते. जेव्हा आपण आपल्या प्रयत्नांचा परिणाम समजून त्याचा आपल्या इच्छेशी किंवा कृतिशी संबंध जोडतो, तेव्हा अडचणी उत्पन्न होतात. फक्त ह्याच कारणामुळे आपण यशाने हुरळून जातो आणि अपयशात शोक करतो. हीच एक गोष्ट आहे जी आपल्याला बंधनात जखडून ठेवते. ह्या अहंकारी जाणिवेची अनुपस्थिती म्हणजेच त्या खऱ्या जोमदार शक्तीचे आगमन होय. हे कसे साध्य होणार? फक्त त्या सर्व शक्तिमान परमेश्वराशी स्वतःला जोडणे. असे केले की आपण एका नंतर एक टप्पा पार करत जातो आणि त्याच्या निकट पोहोचतो.”

काही जण केवळ मनाला जरा विश्रांती देण्यासाठी माझ्याजवळ येऊन बसत असतील. माझ्यासाठी हे ही खूप आहे की निदान मी काही वेळासाठी तरी त्यांना समाधान देऊ शकलो. पण फक्त हेच पुरेसे नाही. काही असेही असतील जे साक्षात्कारासाठी नाही पण केवळ मित्रत्वाच्या भावनेनी माझ्याशी जवळीक साधतात. हे ही माझ्यासाठी काही कमी नाही कारण त्यांच्या हृदयात माझ्यासाठी निर्माण होणारे प्रेम मला अतिशय आनंद आणि प्रसन्नता देऊन जाते. पण कोणी माझ्यासाठी ही चिंता का करावी जेव्हा त्यांच्याकडे आवडण्यासारखे, प्रेम करण्यासारखे खूप काही आहे. फक्त तोच, जो स्वतःला पूर्ण विसरला किंवा निदान ज्याला सर्व विसरायला, हरवायला आवडेल, तोच कदाचित माझ्याकडे वळेल. माझ्या मनाचा कल जरा वैशिष्ट्यपूर्ण आहे. मी स्वतःला संपूर्णपणे हरवून बसलो असतांना इतरांनी माझा मागोवा घेतलेला मला आवडतो.”

*स्त्रोतः 'सहज मार्ग' पत्रिका, जुलै १९६४

## निबंधलेखन स्पर्धा २००९
## प्रमाणपत्र वितरण समारोह

लहान मुलांपर्यंत व त्यांच्याद्वारे त्यांच्या कुटुंबियापर्यंत गुरुदेवांचा संदेश पोहोचविण्यासाठी दि. १२ ऑगस्ट २००९ या आंतरराष्ट्रीय युवा दिन रोजी संयुक्त राष्ट्र माहिती केंद्र, भारत आणि भूतान च्या समवेत श्री राम चंद्र मिशनने आयोजित केलेली निबंध लेखन स्पर्धा हे एक महत् कार्य होते.

निबंधांच्या मोठमोठ्या ढिगाऱ्यामधून प्रत्येक निबंध वाचून त्यातील सर्वोत्तम निबंध निवडणे हे एक अतिशय मोठे काम होते. भारतभराच्या केंद्रामधील स्वयंसेवकांनी हे कार्य हाती घेतले आणि राष्ट्रीय, क्षेत्रीय आणि शालेय स्तरावरती निबंध निवडले. अत्युत्तम निबंध लिहिणाऱ्या मुलांचे अभिनंदन करण्यासाठी मोठ्या शहरांमध्ये प्रमाणपत्र वितरण समारोह आयोजित करण्यात आले. मुलांना, त्यांच्या पालकांना व शाळेतील सोबत आलेल्या इतर कर्मचाऱ्यांना संस्थेबद्दलची माहिती सांगून या निबंधस्पर्धेमागील हेतु सांगण्याची ही एक चांगली संधीदेखील होती. या स्पर्धेद्वारे मुलांमध्ये नितीमुल्ये बिंबविण्याचा मिशनचा प्रयत्न पाहून पालक व शिक्षकांना आनंद झाला. बरेचजण सहजमार्ग पद्धतीने प्रभावित झाले आणि याबद्दल जास्त माहिती करून घेण्यासाठी वा संस्थेमध्ये सामील होण्यासाठी इच्छुक होते. या स्पर्धेद्वारे अनेकांना आपापल्या क्षमतेनुसार काम करण्याची संधीदेखील मिळाली.

भारताच्या कानाकोपऱ्यातून हा प्रमाणपत्र वितरण समारोह कसा संपन्न झाला हे सांगणारे काही उतारे खाली दिले आहेत.

### पट्टांबी, केरळ

२१ फेब्रुवारी रोजी ३२ मुलांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. बंधु क्रिश्नन वी ए, बंधु शशिकुमार के पी व बंधु नारयणन यांनी श्रोत्यांशी हितगुज केले. मुलांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आणि हे विषय नवीन, आकर्षक व आजच्या काळानुरुप असल्याचे सांगितले.

### अहमदाबाद, गुजरात

अहमदाबाद येथील सुमारे १९० शैक्षणिक संस्थांनी आपापल्या परिसरांमधून यामध्ये भाग घेतला आणि ८५०० हून अधिक प्रतिस्पर्ध्यांनी आपापल्या गटांमधून निबंध लिहिले. त्यापैकी ६ जण स्थानिक विजेते होते. अहमदाबादच्या वरिष्ठ अभ्यासींनी दि. २८ फेब्रुवारी रोजी अदलज योगाश्रम येथे प्रमाणपत्र वितरित केले. प्रतिस्पर्धी व पालकांसमवेत सुमारे १२०० निमंत्रित उपस्थित होते.

### मुरादाबाद, उत्तर प्रदेश

या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील ८४ शाळांमधून ६७०० हून अधिक मुलांनी भाग घेतला. दि. २४ फेब्रुवारी रोजी योगाश्रम येथील एका कार्यक्रमामध्ये बंधु श्रवणकुमार (केंद्रप्रमुख) व भगिनी छवी यांनी समुदायाला संबोधित केले. प्रतिस्पर्ध्यांना प्रमाणपत्र वितरित केले गेले व शाळा व महाविद्यालयांना मान्यतापत्रे देण्यात आली. प्रमुख पाहुणे श्री राम मूर्ती (मुरादाबादचे मुख्य विकास अधिकारी) यांनी या कार्यक्रमाद्वारे मुलांम्ध्यी नीतीमत्ता बाणवण्याच्या या प्रयत्नांची प्रशंसा केली.

### अभेदोनपुरा, उत्तर प्रदेश

दि. २१ फेब्रुवारी रोजी सुमारे १८० विद्यार्थी, २२० पालक, अनेक शाळा व कॉलेजांमधून शिक्षक व मुख्याध्यापक आदि या कार्यक्रमाला उपस्थित होते. विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना अशाप्रकारच्या निबंध लेखन स्पर्धांचा लाभांविषयी सांगण्यात आले. त्यानंतर प्रमाणपत्रे वितरित केली गेली.




### कोल्हापूर, महाराष्ट

हा सोहळा दि. १८ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आला. एकूण ७५ शाळा व ६ महाविद्यालयांनी यात भाग घेतला आणि सुमारे ३५०० निबंध जमा केले गेले. महाराष्ट्राचे क्षेत्रीय प्रभारी बंधु सुभाष वैद्य यांनी उपस्थितानां संबोधित केले.

### औरंगाबाद, महाराष्ट्र

पारितोषिक विजेते विद्यार्थी, त्यांचे पालक आणि शाळांचे मुख्याध्यापकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम दि. २७ फेब्रुवारी रोजी पार पडला.

### नागपूर, महाराष्ट

२५ शाळांमधून सुमारे १००० विद्यार्थ्यांनी या निबंध स्पर्धेमध्ये भाग घेतला. दि. ७ मार्च रोजी हा कार्यक्रम गांधीनगर आश्रमात घेतला गेला.

### इंदौर, मध्य प्रदेश

सुमारे २४ केंद्रांनी दि. २१ फेब्रुवारी रोजी एका खुल्या मंचाचे आयोजन केले होते. स्वयंसेवकांनी प्रत्येक शाळेमध्ये जाऊन व मुलांच्या घरांमध्येही जाऊन त्यांच्या पालकांना आमंत्रित केले. त्याचाप्रतिसाद खरोखरीच प्रोत्साहित करणारा होता व दूरवरच्या व लहान केंद्रामधलेही लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुमारे ३०००-३५०० लोकांना याखुल्या मंचाद्वारे सहजमार्गाची ओळख करुन देण्यात आली.

### पुणे, महाराष्ट

नांदेड आश्रमामध्ये झालेल्या कार्यक्रमामध्ये भगिनी रुपाली म्हणाल्या की, आपण सर्व साधारणपणे नकारात्मक मनोवृत्तीचे असतो आणि आपणाला बदलले पाहिजे. आपल्या युवापीढीने आपल्या अंतरात पाहून स्वत:चे खरे रूप पाहिले पाहिजे जेणेकरून बाह्य जगाला सामोरेजाता येईल कारण हे आंतर्विश्वच आहे जे बाह्यविश्व घडविते. बंधु कौस्तुभ यांनी या स्पर्धेची आकडेवार माहिती दिली व प्रमुख पाहुणे बंधु शुक्ला 'सहज मार्ग: मननियमनाची पद्धती' या विषयावर बोलले. प्रशंसेचे द्योतक म्हणून प्रशस्तिपत्र वितरित करण्यात आली. अंध मुलांच्या शाळेसाठी टाळ्यांचा एकच गजर झाला.

### बेंगलोर, कर्नाटक

दि. २१ फेब्रुवारी रोजी बेंगलोर येथील बनशंकरी आश्रामामध्ये या क्षेत्राची प्रमाणपत्रे वितरित केली गेली. प्रत्येक गटातील प्रथम परितोषिक विजेत्याला त्यांचा निबंध वाचून दाखविण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. त्यामधील प्रत्येकामध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास व दिलेल्या विषयावर गहन विचार करण्याची क्षमता दिसून आली. अभ्यासींच्या लहान व आत्मविश्वासू मुलांनी नीतीमुल्ये शास्त्रीय प्रयोगाद्वारे कशी शिकविता येतात अशा मुल्याधारित प्रशिक्षणाची हृदयस्पर्शी प्रात्यक्षिके करुन दाखविली. गुरुदेवांची एक ध्वनिचित्रफीत (video) दाखविण्यात आली व त्यानंतर भगिनी माधुरी वेंकट यांनी सहज मार्गाच्या ध्येयाविषयी थोडक्यात माहिती सांगितली.

## भावनगर, गुजरात

दि. २१ फेब्रुवारी रोजी सिल्व्हर बेल येथील ध्यानगृहामध्ये समारोहाचे आयोजन करण्यात आले होते. निबंधस्पर्धेची समन्वयक भगिनी वृषिका यांनी भावनगर केंद्राची आकडेवारी सादर केली, उपस्थित समुदायास नवसारी येथील निबंध समन्वयक बंधू विनय व भावनगरचे केंद्रप्रमुख बंधू धर्मेशभाई यांनी संबोधित केले.

## भूज, गुजरात

दि. रोजी भूज येथील सहयोग भवनामध्ये समारोहाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुमारे २५० पाहूणे उपस्थित होते. स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या ३२ शाळा, त्यांचे मुख्याध्यापक, प्रमाणपत्र मिळविणारे विद्यार्थी व त्यांचे पालक या सर्वांना आमंत्रित केले होते. प्रमुख पाहूणे म्हणून श्री. महेंद्रसिंह उपस्थित होते. यावेळी केंद्रप्रमुख भगिनी हर्षा चौहान व निबंध समन्वयक बंधु गोपी त्रिवेदी यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

याचप्रमाणे गांधीधाम केंद्रामध्ये अंजर भागातील आमदार हे प्रमुख पाहुणे म्हणून तर गांधीधाम नगरपालिकेचे अध्यक्ष हे विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाला १८० हून जास्त पाहुण्यांची उपस्थिती लाभली होती.

## चंदिगढ

यावर्षी या कार्यक्रमामध्ये १६ शाळा, ४ महाविद्यालये व पंजाब विद्यापीठ, चंदिगढ, पंचकुला व मोहाली येथील अनेक शैक्षणिक संस्था सहभागी झाल्या होत्या. दि. २८ फेब्रुवारी रोजी विभागीय पातळीवर यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी आयोजिलेल्या कार्यक्रमात विभागीय समन्वयक भगिनी कानन सचदेवा, भगिनी गुरुदेव कौर व भगिनी सुदर्शन यांनी उपस्थित जनसमुदायास संबोधित केले. २७ विभागीय विजेत्यांना विभागप्रमुख बंधु मेजर जनरल हरभजनसिंह यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

## लुधियाना, पंजाब

दि. ११ एप्रिल रोजी पंजाब कृषी विद्यापीठाच्या जेकब हॉल येथे विभागस्तरावर ८ विद्यार्थ्यांना व जिल्हास्तरावर ४० विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले. विभागस्तरावरील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, पुस्तक व स्मृतीचिन्ह प्रदान करण्यात आले व ईतरांना 'माझे गुरुदेव' या पुस्तकासह प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. सेंट थॉमस शाळेस उत्कृष्ठ सहभागिता पुरस्कार चषक देऊन गौरवण्यात आले. प्रसिद्ध शिक्षणतज्ञ डॉ. एम. ए. जहीर, डॉ. प्रेम कुमार व विभागप्रमुख बंधु मेजर जनरल हरभजन सिंह यांची या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

दि. ४ एप्रिल रोजी पानिपत रिफायनरी ऑफीसर्स क्लब येथे पानिपत केंद्राने ३५ विद्यार्थ्यांना गौरवान्वित करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विजेत्यांना श्री राजकुमार घोष व अश्विनी शर्मा यांच्याहस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमात सर्व स्थानिक अभ्यासींनी भाग घेतला होता.

## कोईम्बतूर, तमिळनाडू

दि. २२ फेब्रुवारी रोजी नचिपलायम आश्रमामध्ये सुमारे ६० शाळांचे १२० विद्यार्थी आपल्या पालकांसोबत हजर होते. केंद्रप्रमुख बंधु के.आर.वैद्यनाथन यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर बंधु टी. एस. मणियम व भगिनी के. ईश्वरी यांनी त्यांना संबोधित केले. बंधु वैद्यनाथन यांनी विद्यार्थ्यांना पुस्तकांसह प्रमाणपत्रांचे वितरण केले. या केंद्रामधून ४ विभागिय विजेत्यांना “माझे गुरुदेव” या पुस्तकाच्या प्रतीसह प्रमाणपत्र दिले गेले. चार संस्थांना कृतज्ञता प्रमाणपत्र देण्यात आली.




## गुवाहाटी, असम

दि. ४ एप्रिल रोजी गुवाहाटी व आजुबाजुच्या परिसरातील शाळांमधून निवडलेल्या सर्वोत्कृष्ठ दोन निबंधांसाठीच्या ९० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यासाठी बंधु सिद्धेश्वर पांडे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. बंधु असोके सेनगुप्ता यांनी उपस्थितांसमोर सादरीकरण केले. यावेळी प्रश्नोत्तराचे सत्रदेखील पार पडले.

## हुबळी, कर्नाटक

हुबळी व धारवाडच्या स्वयंसेवकांमध्ये निबंधस्पर्धेच्या कार्यक्रमामुळे अतिशय उत्साह व बंधुत्वभावना दिसून येत होती. प्रमुख पाहूणे श्री विष्णू भास्कर भट यांनी आजच्या समाजामध्ये अशया कार्यक्रमांचे महत्व अधोरेखित केले. त्यांना हे माहितही नव्हते की असे काही मिशन अस्तित्वात आहे व कुठल्याही जाहिरातीशिवाय ते कार्य करित आहेत. सरकारी शाळेचे मुख्याध्यापक श्री सारंगमठ म्हणाले की असे खुपच कमी व्यक्ति किंवा संस्था आहेत जे तेच करतांत जे शिकवितात व एस.आर.सी.एम. ही त्यापैकी एक संस्था आहे जी तेच करते आहे जे ते शिकवीत आहेत. सुमारे ७० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आलीत. दोन छोट्या नाटिका यावेळी तरुण व लहान मुलांद्वारे सादर करण्यात आल्या ज्याचा सर्वांनी आनंद घेतला व सर्वांनाच त्या आवडल्या.

## लखनऊ, उत्तर प्रदेश

लखनऊमध्ये १८० शाळा व महाविद्यालयांमधून विद्यार्थी या कार्यक्रमामध्ये सहभागी झाले होते. बंधु यु. एस. बाजपेई यांनी विविध विभागातील विजेत्यांना पुरस्कार प्रदान केले. यावेळी विभागप्रमुख बंधु शामजी मेहेरोत्रा यांनी सर्वानां संबोधित केले.

## तेजपूर

दि. ११ एप्रिल रोजी विजेते, त्यांचे पालक व शिक्षकांसह २००जण एकत्रित झाले होते. यावेळी काही मुमुक्षूंनी साधना सुरु करण्याची तयारी दाखविली. या कार्यक्रमाची सांगता मिशनच्या प्रार्थनेने झाली.

## त्रिसुर, केरळ

रविवार दि. २८ फेब्रुवारी रोजी योगाश्रम त्रिसुर येथे केंद्रप्रमुख बंधु टी.पी.नारायणन यांनी विविध शाळा व महाविद्यालयांमधून आलेल्या विद्यार्थी, त्यांचे पालक व शिक्षकांचे स्वागत केले. या कार्यक्रमामध्ये ३१ शाळा व विद्यालयातील सुमारे ८०० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. केरळमधील 'स्मृती'चे समन्वयक बंधु ए. माधवन यांनी उपस्थितांना संबोधित केले. विभागप्रमुख बंधु के.यु.मोहन यांनी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप केले व संस्थांना कृतज्ञता प्रमाणपत्रे प्रदान केली.

## वडोदरा, गुजरात

दि. २८ फेब्रुवारी रोजी अलकापुरी येथील बरोडा माध्यमिक विद्यालयात सुमारे २०० जण एकत्र आले होते. भगिनी पुनम बब्बर, सुरत येथील डॉ. सुरेन्द्र अग्रवाल, भगिनी प्रभा शर्मा व बंधु हिरेन शहा यांनी या समुदायास संबोधित केले. या पाहुण्यांना प्रतिक्रिया नोंदविण्यासाठी अर्ज देण्यात आले होते यावेळी बऱ्याच जणांनी साधना सुरु करण्यात स्वारस्य दाखविले.

# अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम

## मोरादाबाद
दि. ७ मार्च रोजी मोरादाबाद केंद्रामध्ये प्रथम स्तरीय अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. बंधु सुधांशू यांनी सादर केलेला ह्या कार्यक्रमामध्ये सुमारे ३० अभ्यासी उपस्थित होते. यावेळी दाखविल्या गेलेल्या पू. बाबूजी व गुरुदेवांच्या दुर्मिळ ध्वनिचित्रमुद्रिका पाहून सर्वजण खुपच आनंदित झाले होते. यानंतर अनेक जणांनी आपले मनोगत सादर करतांना आपली मते मांडली त्यानुसार याप्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम नवीन अभ्यासींसाठी खुपच लाभदायक आहेत आणि आता त्यांना पद्धती अधिक स्पष्टपणे कळली आहे व लक्ष्य गाठण्यासाठी प्रोत्साहन मिळाले आहे.

## नानौटा
रविवार, दि. ४ एप्रिल रोजी बंधु राजीव कुमार यांनी प्रथमस्तरीय अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे संचालन केले. सुमारे २४ अभ्यासी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## श्रीविलीपूथूर
विरुधनगर जिल्ह्यातील या केंद्रामध्ये दि. ७ मार्च रोजी भगिनी बी. पोन्नुथाई व बंधु व्ही. बालासुब्रमण्यम यांनी अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे संचालन केले. श्रीविलीपूथूर, राजपलायम, थिरुथंगल, शिवाकाशी या आसपासच्या केंद्रातील सुमारे २५ अभ्यासी यावेळी सहभागी झाले होते. हा कार्यक्रम फक्त नवीन अभ्यासींसाठीच नव्हे तर इतरांसाठीसुद्धा उपयोगी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले होते.

## कुर्नुल
दि. २८ फेब्रुवारी रोजी सुमारे २३ नविन अभ्यासींसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रचंड उत्साह व संवादातून यावेळी अनेक बाबींचे स्पष्टीकरण करण्यात आले. साधनापद्धतीमधील अनेक मूलभूत बाबींचे स्पष्टीकरण पू. गुरुदेवांच्या ध्वनिचित्रफितीच्या माध्यमातून करण्यात आले.

## बेल्लारी
दि. १४ फेब्रुवारी रोजी, बेल्लारी येथे बंधु सोनथा सुधाकर यांच्या घरी ध्यानगृहामध्ये अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कन्नड भाषेतील या कार्यक्रमास २५ अभ्यासी हजर होते. यावेळी बंधु निजलिंगप्पा, बंधु प्रल्हाद पाकनिकर व बंधु राजू काशमपूरकर यांनी सर्वांना संबोधित केले. यावेळी अभ्यासींना मोठ्याप्रमाणावर लाभ झाल्याचे जाणवले व असे कार्यक्रम वारंवार आयोजित केले जावेत अशी भावना व्यक्त करण्यात आली.

## सिक्का
सिक्का हे दुर्गम भागातील नव्याने विकसीत होत असलेले व सुमारे ६० उत्साही अभ्यासी असणारे जामनगरमधील उपकेंद्र आहे. दि. ११ एप्रिल रोजी अहमदाबादच्या बंधु अंकित व्यास यांनी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ज्यावेळी बंधु अंकित हिन्दीमध्ये सादरीकरण करीत होते त्यावेळेस सर्व उपस्थितांमध्ये अतिशय उत्साह दिसून येत होता. ज्यावेळी पू. गुरुदेवांच्या चित्रफिती दाखविण्यात येत होत्या त्यावेळी प्रत्येकाला त्यांची विशेष उपस्थिती जाणवत होती.

## राजनांदगाव
दि. २८ मार्च रोजी आसपासच्या केंद्रातील अभ्यासी बंधु व भगिनींकरिता बंधु दिपक त्यागी व बंधु विजय अय्यर यांनी हिन्दीतून अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी केल्यागेलेल्या सादरीकरणावर अभ्यासी अतिशय खुष होते कारण प्रथमच त्यांना अश्या पदधतीने समरस झाल्याचे जाणवत होते ज्यामध्ये त्यांना वाचन व ग्रहणशिलतेचा उपयोग करावयाचा होता व एवढेच नाहीतर त्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे पू. गुरुदेवांच्या उदगाराद्वारे किंवा त्यांच्या चित्रफितीद्वारे देण्यात येत होती.

## पेंन्ड्रा
छत्तीसगढ राज्यातील दुर्गम अश्या पेंन्ड्रा केंद्रामध्ये हिन्दीतून अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ५८ अभ्यासी बंधु भगिनी सामिल झाले होते ज्यापैकी ४० बंधु भगिनी हे ग्रामिण पार्श्वभूमी असलेले होते परंतू त्यांची समरसता कल्पनेपलिकडील होती. संपूर्ण वातावरण हे भंडाऱ्याप्रमाणे होते. या कार्यक्रमाचे संचालन बंधु दिपक त्यागी, बंधु श्रीनिवास व भगिनी ललिता त्यागी यांनी केले तर आयोजन बंधु स्वप्नील खत्री यांनी केले होते.

## रायपूर
दि. ४ एप्रिल रोजी झालेला अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रमास सुमारे ५२ अभ्यासी हजर होते. अभ्यासी अतिशय गंभीरपणे सहभागी झाले होते व बंधु दिपक त्यागी समवेत एक उत्तम असे प्रश्नोत्तराचे सत्र पार पडले. या कार्यक्रमाचे संचालन बंधु विष्णू उपाध्याय, बंधु सतिश शर्मा व बंधु देवनारायण यांनी केले.

## बिलासपूर
दि. ७ मार्च रोजी हिन्दीतुन अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्मृतीद्वारे (SMRITI) आयोजित या कार्यक्रमाच्या रुपरेखेला सर्वांनीच पसंत केले.

## दुर्ग
दि. २१ फेब्रुवारी रोजी हिन्दीतून अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याची सुरुवात केंद्र प्रमुख बंधु डी. के. निगम यांनी केली. अतिशय पवित्र व उत्साही वातावरणांत ३७ अभ्यासी यामध्ये सहभागी झाले होते. याचे संचालन विभागप्रमुख बंधु दिपक त्यागी व बंधु श्रीनिवास देशमुख यांनी केले. बंधु दिपक त्यागींबरोबर झालेले प्रश्नोत्तराचे सत्र सर्व अभ्यासींना खुपच आवडले.

## जामनगर
चर्चासत्राची सुरुवात गर्दीने खचाखच भरलेल्या टाऊन हॉलमध्ये 'समतोल अस्तित्व व ध्यान" या विषयाने झाली. या चर्चासत्राच्या निमीत्ताने अभ्यासींनी आपल्या मित्रांना, नातेवाईकांना व सहकाऱ्यांना सहजमार्गाची ओळख करुन देण्याची संधी साधली. चर्चासत्राची सुरुवात दोन शास्त्रीय नृत्याद्वारे करण्यात आली. जयश्रीबेन लालभाई यांनी सहजमार्गातील आपले अनुभव सांगतांना आजच्या जीवनामध्ये ध्यानाद्वारे समतोल जीवनाची गरज अधोरेखित केली.

बंधु हिरेनभाई शहा यांनी ध्यानाची सहजमार्ग पद्धत समजावून सांगितली व रोजच्या जीवनामध्ये त्याची भूमिका स्पष्ट केली. बंधु सुरेश राजगोपालन यांनी मानवी जीवनातील सर्वोच्च लक्ष्य साध्य करण्यासाठी सहजमार्ग पद्धतीची उपयुक्तता विशद केली व अध्यात्मिक प्रगती साधत असतांनाच आपण आपले भौतिक जीवन कसे जगू शकतो हे सांगितले.
सर्व भाषणे संपल्यानंतर श्रोत्यांना व्यक्त्यांसोबत व एस.आर.सी.एम.च्या स्वयंसेवकांसोबत संवाद साधण्याची संधी मिळाली त्यापैकी काहींनी सहजमार्गाविषयी अधिक जाणून घेण्यात स्वारस्य दाखविले तर काहींनी पद्धती सुरु करण्यामध्ये स्वारस्य दाखविले.



# प्रकाशाचे केंद्र

आता आश्रमात असं वेगळं काय असते? आश्रमही पू. गुरूदेवांनी प्रभारित केलेले असतात. पण जेव्हा आपण ध्यान करण्यास बसतो तेव्हा आपण ते अधिकाधिक प्रभारित करत असतो. देवळांमध्ये हा प्रभार सतत कमी होत असतो तर आश्रमांमध्ये सतत वाढत असतो. म्हणून जे आश्रमांमध्ये करायला हवे ते जर तुम्ही करत असाल, तर पन्नास वर्षांनंतर तो अधिक चांगला प्रभारित असेल, सुरेख वातावरण, काही वेळेस इतके तरल की तुम्ही म्हणू शकाल 'हाच स्वर्ग आहे. हेच ते प्रकाशमय जग ('ब्राइटर वर्ल्ड') आहे.'

७ जानेवारी २००४, ओंगोल आश्रमाचे उद्‌घाटन.

## ओंगल आश्रम

### छोट्या गावांतली विशाल हृदयांची निर्मिती



ओंगोल हे आंध्र प्रदेशातील प्रकासम जिल्ह्याचे मुख्य केंद्र आहे. एक गंमतीदार म्हणजे बाबूजी महाराज १९६९ साली मद्रासला जात असतांना त्यांची आगगाडी जोरदार वादळ आणि पुरामुळे एका दुर्गम जागी ७२ तासांसाठी अडकून पडली होती. आणि ती जागा होती ओंगोल आणि उप्पुगुंडुरू ह्या दोन गावांच्या मध्ये. बाबूजी महाराजांनी तेव्हा नक्कीच अध्यात्माची बिजं ह्या प्रदेशात पेरली असली पाहिजेत, आणि त्याचाच परिणाम आहे की आज इथे शेकडो अभ्यासी असलेले एक परिपूर्ण केंद्र आणि आश्रम आहे.



ओंगोल चे पहिले प्रशिक्षक बंधु के. कुप्पुस्वामी ह्यांच्याकडे ९० च्या दशकाच्या सुरूवातीला अगदी मोजके अभ्यासी होते. १९९४ साली बंधु बी. नागेश्वरराव संस्थेत सामिल झाले आणि संस्थेच्या विस्तारात त्यांनी फारच मोलाचे कार्य केले. १९९९ पर्यंत ओंगोल आणि चिमकुर्थी, मेडरमेटला, अड्डनकी ह्या गावांतील अभ्यासींची संख्या ३५० जवळ पोहोचली. बंधु नागेश्वरराव ह्यांची प्रशिक्षक म्हणून नियुक्ती झाली व सत्संग त्यांच्या घरीच होऊ लागला. मग तिव्रतेने आश्रमाची गरज भासू लागली. स्थानिक अभ्यासींच्या मदतीने ओंगोल शहराच्या बाहेर पेरणामिट्टा गावाच्या हद्दीत एस्. एन्. पाडू मंडल येथे आश्रमासाठी पाच एकर आणि वसाहतीसाठी ४९ एकर जमीन खरेदी केली गेली.

२२ डिसेंबर २००० रोजी पु.गुरूदेवांनी प्रस्तावित जागेला भेट दिली, पायाभरणी केली आणि बांधकामाला मंजूरी दिली. बांधकामाचा आढावा घेण्यासाठी पु.गुरूदेवांनी लागोपाठ दोन वेळा ह्या जागेला भेट दिली. ७ जानेवारी २००४ रोजी त्यांनी नविन आश्रमाचे उद्‌घाटन केले, त्याचे 'धर्माश्रम' असे नामकरण करून त्यांनी आपले गुरूदेव बाबूजी महाराजांना ते समर्पित केले. ह्या प्रसंगी सहा हजार अभ्यासी उपस्थित होते. गुरूदेवांनी 'हृदयांचे समर्पण' ह्या विषयावर भाषण देतांना ह्याचा विषेश उल्लेख केला की स्थानिक अभ्यासींनी हातचे काही न राखता केलेल्या सहकार्यामुळेच एखाद्या मोठ्या शहरात शोभतील अश्या छाप पाडणाऱ्या इमारती छोट्या गावात उभारता आल्या.



ह्या इमारतीमध्ये पहिल्या मजल्या समोर सुंदर पायऱ्या असणारे २००० क्षमतेचे विस्तृत ध्यान कक्ष, तळघरात आरामकक्ष, गुरूदेवांचा कक्ष, स्वयंपाकघर, स्वच्छतागृहे आणि विद्युतजनित्रासाठी खोली इत्यादिंचा समावेश आहे. सौंदर्यपूर्ण रेखाटन केलेला हा भाग आणि सावली देणारी झाडे ह्यामुळे आश्रमाचे वातावरण अधिकच सुखद बनते. ओंगोल ही मोफत अन्न मिळणाऱ्या आश्रमातील एक म्हणून घोषित केला आहे. रोज सकाळी इथे ६:३० वाजता सत्संग होतो.





To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org

© 2009 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. “Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", “Constant Remembrance” and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.